॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
## NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT
Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246
website: srtmun.ac.in
E-mail: nss@srtmun.ac.in

दिनांक : २०/०२/२०२५

जा.क्र.: रासेयो/२०२४–२५/३८५

परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषयः अवयवदान प्रबोधनाने दरवर्षी ४ लाख व्यक्तींना जीवदान देण्याचे व १ लाख अंधांना दृष्टी देण्याचे मोफत ऑनलाईन प्रशिक्षणात रा.से.यो. स्वंयसेवकांच्या सहभागा बाबत.

संदर्भः मा. राज्यसंपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय मुंबई यांचे जा. क्र.रासेयो–२०२५/प्र.क्र.०८/ई–९३२२७४/रासेयो कक्ष दि २८ फेब्रुवारी २०२५..

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये डॉ. निलेश एम. पाठक, मा. राज्यसंपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय मुंबई यांनी केंद्र शासनाच्या "राज्य अवयव प्रत्यारोपण समितीच्या" (ROTTO/SOTTO) तज्ञांचे मार्गदर्शन घेवून V4 ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांनी अवयवदान प्रबोधन प्रशिक्षणाचे परिपूर्ण साहित्य तयार केले आहे. सदर कार्याचे महत्व जाणून इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य मुंबई ही संस्था V4 ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांच्या कार्यक्रमात सहभागी झालेली आहे. V4 ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांनी मागील ३ वर्षात १४ हजाराहून जास्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले असून, १० तासांत २ लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे. त्यानुषंगाने टेलिग्रामद्वारे ऑनलाईन १० (दहा) तासांचे अवयवदान प्रबोधनाचे मोफत प्रशिक्षण देण्यासाठी खालील मुद्यांबाबत सुचना रा.से.यो. स्वंयसेवकांना त्यांच्या व्हॉट्सअप ग्रुपवर देण्यात यावी असे कळविले आहे.

"सर्व रासेयो स्वंयसेवकांनी १० (दहा) तासांचे अवयवदान प्रबोधनाचे मोफत ऑनलाईन प्रशिक्षण दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ पूर्वी पुर्ण करावे. प्रशिक्षण आठ भागात असून" ऑनलाईन अवयवदान प्रबोधन प्रधिक्षणाची सर्व माहिती आणि मोफत प्रशिक्षण सामुग्री मिळविण्यासाठी रासेयो स्वंयसेवकांनी खालील लिंक वापरून टेलिग्राम ग्रुप जॉईन करावा.

Academic Year 2024-25 Free Study Material online training in Organ donation awareness
https://t.me/+ucknS5R2KMIyMjII1

त्याचप्रमाणे प्रशिक्षणांत येणा–या अडचणी सोडविण्यासाठी खालील लिंक वरून दुस–या टेलिग्राम ग्रुपमध्ये सामील व्हावे.

https://t.me/+fhjNBBSsrvY5NjI1

तसेच सदरचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर सहभागी रा.से.यो. स्वंयसेवकांना V4 ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई या संस्थेकडून ई–सर्टिफिकेट मिळेल. प्रशिक्षणासाठी लागणारा कालावधी रासेयो स्वंयसेवकांच्या नियमित उपक्रमांसाठी लागू असलेला कालावधी धरण्यात येईल. याव्यतिरिक्त ज्या महाविद्यालयांच्या शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे त्या महाविद्यालयातील रासेयो स्वंयसेवकांच्या नेत्यांना १०० प्रशिक्षण पूर्ण करणा–या विद्यार्थ्यांमागे १ या प्रमाणात V4 ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांच्याकडून शिष्यवृत्ती देण्यात येईल. ती शिष्यवृत्ती महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या हस्त स्वंयसेवकांना प्रदान करण्यात येईल.

तरी त्यानुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात रा.से.यो. स्वंयसेवकांना टेलिग्रामद्वारे ऑनलाईन १० (दहा) तासांचे अवयवदान प्रबोधनाचे मोफत ऑनलाईन प्रशिक्षणात उपरोक्तपणे नमुद केलेल्या मुद्याप्रमाणे दिलेल्या लिंक वर जॉईन होऊन प्रशिक्षणात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, ही विनंती.

डॉ.मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१,
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२५/प्र.क्र.०८/ई-९३२२७४/रासेयो कक्ष, दिनांक: १८ फेब्रुवारी, २०२५.

प्रति,

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
रासेयो संलग्नित सर्व विद्यापीठे व संचालनालये

**विषय : अवयवदान प्रबोधनाने दरवर्षी ४ लाख व्यक्तींना जीवनदान देण्याचे व १ लाख अंधांना दृष्टी देण्याचे मोफत ऑनलाईन प्रशिक्षण राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना देणेबाबत....**

**संदर्भ** : श्री. श्रीकांत एम. आपटे, अध्यक्ष आणि प्रशिक्षण समन्वयक, V4 ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांचे दिनांक ०१ जानेवारी, २०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयांकित संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या **"राज्य अवयव प्रत्यारोपण समितीच्या"** (ROTTO/SOTTO) तज्ञांचे मार्गदर्शन घेऊन V4ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांनी अवयवदान प्रबोधन प्रशिक्षणाचे परिपूर्ण साहित्य तयार केले आहे. सदर कार्याचे महत्त्व जाणून इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई ही संस्था V4ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांच्या कार्यक्रमात सहभागी झालेली आहे. V4ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांनी मागील ३ वर्षात १४ हजारहून जास्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले असून, १० तासांत २ लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे. त्यानुषंगाने टेलिग्रामव्दारे ऑनलाईन १० (दहा) तासांचे अवयवदान प्रबोधनाचे मोफत प्रशिक्षण देण्यासाठी कृपया खालील मुद्यांबाबतीत सूचना आपल्यामार्फत सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना त्यांच्या व्हॉट्सअप ग्रुपवर देण्यात यावी.

"सर्व रासेयो स्वयंसेवकांनी १० (दहा) तासांचे अवयवदान प्रबोधनाचे मोफत ऑनलाईन प्रशिक्षण दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ पूर्वी पूर्ण करावे. प्रशिक्षण आठ भागात असून "ऑनलाइन अवयवदान प्रबोधन प्रशिक्षणाची सर्व माहिती आणि मोफत प्रशिक्षण सामुग्री मिळवण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी खालील लिंक वापरून टेलिग्राम ग्रुप जॉईन करावा.

Academic Year 2024-25 Free Study Material online training in Organ donation awareness

https://t.me/+ucknS5R2KMIyMjI1

त्याचप्रमाणे प्रशिक्षणांत येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी खालील लिंक वरून दुसऱ्या टेलिग्राम ग्रुपमध्ये सामील व्हावे :

FAQ 2024-25 Online Training

https://t.me/+fhjNBBSsrvY5NjI1

तसेच सदरचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सहभागी रासेयो स्वयंसेवकांना V4ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई या संस्थेकडून ई-सर्टिफिकेट मिळेल. प्रशिक्षणासाठी लागणारा कालावधी रासेयो स्वयंसेवकांच्या नियमित उपक्रमासाठी लागू असलेला

कालावधीत धरण्यात येईल. याव्यतिरिक्त ज्या महाविद्यालयाच्या शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे, त्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांच्या नेत्यांना १०० प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांमागे १ या प्रमाणात V4ऑर्गन फाऊंडेशन, मुंबई यांच्याकडून शिष्यवृत्ती देण्यात येईल. ती शिष्यवृत्ती महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या हस्ते स्वयंसेवकांना प्रदान करण्यात येईल. त्यामुळे स्वयंसेवकांना सन्मान झाल्याचे समाधान मिळेल.

त्यानुषंगाने आपल्या स्तरावरून आवश्यक त्या सूचना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांमार्फत सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना देण्यात याव्यात.

आपला,

(डॉ.निलेश मो. पाठक)
राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना,
महाराष्ट्र शासन

Shoo) Shaikh
Prepare a circular
20/02/25